# ओझरचा श्री विघ्नेश्वर

**सर्व विघ्नांचा जो करी नाश...त्या श्री विघ्नेश्वराच्या उपासनेचा घ्यावा सर्वांनी ध्यास...**



## श्री क्षेत्र ओझर :

अष्टविनायकांपैकी ओझरचा विघ्नेश्वर हा पाचवा गणपती आहे. सर्व अष्टविनायकांच्या स्थानात हे स्थान अतिशय रमणिय म्हणून प्रसिद्ध असून अष्टविनायकात श्रीविघ्नेश्वराला फार मोठा मान आहे. जुन्नर तालुक्यातील हे स्थान लेण्याद्रीपासून १४ कि.मी. वर तर पुण्यापासून ८५ कि.मी. अंतरावर आहे. येथून जवळच आर्वी उपग्रह केंद्र व खोडद येथील आशिया खंडातील सर्वात मोठी दुर्बिण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला हादेखील जवळच आहे.

## महिमा :

पृथ्वीवरील सर्व वैदीक कर्मांचा नाश करणारे म्हणून हे स्थान ओळखले जाते. येथील तीर्थात जे स्नान करतात, जे या क्षेत्राची यात्रा करतात ते गणपतिभक्त कृतकृत्य होतात.

# विघ्नेश्वराचे देवालय :

कुकडी नदीच्या तीरावर असलेले हे मंदिर एक जागृत स्थान आहे. श्री विघ्नेहराचे देवालय पूर्वेकडे तोंड करुन आहे. गाभाऱ्यात चारही बाजूंना छोटे कोनाडे असून त्यात पंचायतनाच्या मूर्ती आहेत. आतील गाभाऱ्यात दोन गवाक्षे असून त्यांना लावलेल्या काचातून आत उजेड येतो. आत चारही बाजूंना आरशाची रांग आहे. श्रींच्या डावीकडे भिंतीवर कमलावर आरुढ अशी लक्ष्मी व उजवीकडे श्रीविष्णूचे चित्र रेखाटले आहे.

मंदिराच्या चारही बाजूंना तटबंदी-बांधकाम असून, मध्यभागी गणेशाचे मंदिर आहे. तटावरुन चालण्यासारखी पायवाट आहे. मुख्य देवाच्या मूर्तीसमोरचा मंडप औरसचौरस १० फूट आहे. त्यानंतर खुल्या दारातून बाहेर पडले, म्हणजे दाराशीच काळया कुळकुळीत गुळगुळीत दगडाचा उंदीर पळण्याच्या तयारीत असलेला असा आहे. या मंडपाला लागूनच ७ फूटांचा एक औरसचौरस दुसरा सभामंडप आहे. देवाची शेज यातच आहे. या दुसऱ्या सभामंडपानंतर बाहेर सुमारे २० फुटांचा दगडी फरशी असलेला तिसरा सभामंडप आहे व त्याच्या दक्षिणेला व उत्तरेला द्वारे आहेत. या मंडपात धुंडीराजाची मूर्ती आहे. हा मंडप उतरुन खाली गेले की, खुले दगडी फरशांचे अंगण लागते. ते ३०-४० फूट लांब असेल. या अंगणाच्या परिसरात मुख्य दरवाजाच्या भोवती प्रदक्षिणा घालण्यासाठी १७ फुटांची जागा आहे. अंगणात दोन दीपमाळा असून उत्सवात त्या पाजळल्या जातात. अंगणाच्या कडेला दोन्ही बाजूंना प्रत्येकी २७-३० फूट अशा दगडी ओवऱ्या आहेत. या ओवऱ्यांना आत-बाहेर अशा दगडी डौलदार कमानी आहेत. या ओवऱ्यातून बाहेर पडण्याकरीता पाच फुटी रस्ता आहे. एका ओवरीच्या खाली तळघर असून त्यात हंड्या, झुंबरे, पालखी इ. श्रीचे सामान आहे. दुसऱ्या ओवरीत भैरवनाथाची शेंदूरचर्चित मूर्ती आहे. देवळाचा घुमट कलात्मक असून त्यावर शिखर व सोनेरी कळस आहे.

प्रमुख देवळात शिरताना दोन्ही बाजूंना कोरलेले दगडाचे भालदार चोपदार उभे असलेले दिसतात. देवळाचा दर्शनी भाग कोरीव असून त्यावर दोन ऋषींच्या मूर्ती कोरल्या आहेत. वरच्या बाजूला एक विणाधारी मूर्ती आहे. नदीकडच्या बाजूकडून देवळाकडे येताना प्रथम इनामदारांचा वाडा, नंतर महादेवाचे देवालय आणि नंतर पायऱ्या चढून विघ्नहराच्या मंदिरात येता येते.



देवळाच्या समोर पूर्वेकडे धर्मशाळा, राममंदिर, मुंजाबाचा पार व पिंपळ आहे. देवळाच्या अंगणात विविध प्रकारची झाडे आहेत. परगावाहून देवालयाकडे येताना प्रथम कुकडी नदी ओलांडावी लागते. त्यावर म्हसोबाचे देवस्थान आहे. धबधब्यावर दोन कुंडे आहेत व त्यातून पाणी खाली पडत असते. हा धबधबा जेथे पडतो तेथे पाण्यातला खालचा अंत लागत नाही असे म्हणतात.

## श्री विघ्नेश्वराची मूर्ती :

ओझर येथील श्री विघ्नेश्वराची मूर्ती स्वयंभू आहे. श्रींची मूर्ती लांब रुंद असून अष्टविनायकांपैकी सर्वात श्रीमंत गणपती म्हणून श्री विघ्नेश्वराला ओळखले जाते. मूर्ती पुर्वाभिमुख, पूर्णाकृती आणि आसन मांडी घातलेले आहे. श्रींच्या डोळयात माणिक असून कपाळावर चकचकीत हिरा व नाभीत खडा बसवला आहे. डौलदार महिरपी कमानीतील मूर्तीच्या दोन्ही बाजूस ऋद्धी-सिद्धीच्या पितळेच्या मूर्ती आहेत. प्रसन्न व मंगल मूर्ती असलेला श्रीगणेश विघ्नांचे हरण करतो, म्हणून या गणपतीला विघ्नेश्वर म्हणतात.

## नैमित्तीक उत्सव :

भाद्रपद शुद्ध चतुर्थी व माघ शुद्ध चतुर्थी या दिवशी उत्सव साजरे होतात. याशिवाय त्रिपुरी (कार्तिक) पौर्णिमेपासून कार्तिक वद्य चतुर्थीपर्यंत आणखी एक उत्सव होतो. त्रिपुरी पौर्णिमेला मंदिरात मोठा दिपोत्सव साजरा केला जातो.

## इतिहास :

श्रीमंत बाजीराव पेशवे या गणेशाचे अनन्य भक्त होते. थोरल्या बाजीराव पेशव्यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो. देवाच्या मंदिरावरील शिखर चिमाजी अप्पाांनी बांधले. वसई जिंकून परत येत असताना त्यांनी या देवळाचा जिर्णोद्धार करविला.

## श्री चिंतामणीसंबंधी पौराणिक कथा :

फार प्राचीन काळी हैमवती नगरीत अभिनंदन नावाचा एक राजा राज्य करीत होता. आपल्याला इंद्रपद प्राप्त व्हावे असे त्याला वाटू लागले. ही वार्ता स्वर्गातील इंद्राला नारदमुनींकडून समजली. तो घाबरला. त्याने अभिनंदनाच्या यज्ञान विध्न आणण्यासाठी काळाचे स्मरण केले. त्याच क्षणी अक्राळ-विक्राळ रुप धारण करुन काळ प्रकट झाला. त्याने इंद्राला आज्ञा केली. 'अभिनंदनाच्या यज्ञात विघ्ने निर्माण कर, त्याच्या यज्ञाचा विध्वंस कर.' त्याने आज्ञा मिळताच अभिनंदनाच्या यज्ञाचा विध्वंस केला असे नव्हे, तर पृथ्वीवरील सर्वच वैदिक कर्मांचा नाश केला. धर्माचा लोप झाला. देवांवर हे मोठेच संकट आले. तेव्हा सर्व देवांनी गजाननाची आराधना केली. त्या वेळी गजानन पाराशर मुनींच्या आश्रमात राहत होता. देवांच्या आराधनेने गजानन प्रसन्न झाला. 'मी त्या विघ्नासुराचा बंदोबस्त करतो असे त्याने देवांना आश्वासन दिले.'

मग गजाननाने पाराशरपुत्र होऊन विघ्नासुराशी प्रचंड युद्ध केले. गजाननाच्या प्रचंड शक्तीपुढे विघ्नासुराचे काही चालेना. तो शरण गेला. गजाननाने त्याला आज्ञा केली, 'ज्या ठिकाणी माझे भजन-पूजन-किर्तन चालू असेल तेथे तू जाता कामा नये.' मग विघ्नासुराने गजाननाला वर मागितला, 'तुमच्या नावामागे माझे नाव असावे.' 'विघ्नहर' किंवा 'विघ्नेश्वर' असे नाव धारण करुन या क्षेत्री वास्तव्य करावे. 'तथास्तु' असे म्हणून गजानन म्हणाला,' मी आजपासून विघ्नेश्वर झालो आहे. मी तुला माझ्या गणसमुदायात घेतले आहे. विघ्नेश्वर या नावाने जे कोणी जप करतील त्यांना सर्व सिद्धी प्राप्त होतील.'

